
• पंढरपूर • गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - १३१



सांगोला तालुक्यातील उड्डाणपूलाखालील रस्त्याला नदीचे स्वरुप PII




माढा तालुक्यातील वडोली गावामध्ये अभिजीत पाटलांची घोड्यावरून ... PIII

## साडेसात हॉर्स पॉवरपर्यंत वीज वापरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना वीज बिल माफ

# राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महायुती शासनाने मतदारांना खुश करण्यासाठी वेगवेगळ्या योजना जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. आता शेतकऱ्यांना खुश करण्यासाठी साडेसात हॉर्स पॉवर पर्यंत वीज वापरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना वीज बिल माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करमाळा येथील कार्यक्रमात केली आहे. यामुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावतीने आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राज्यभर जनसंवाद यात्रा सुरू करण्यात आली आहे. ही यात्रा सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे आली असता आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. लोकसभा निवडणुकीत महायुती शासनाला म्हणावे तसे यश मिळाले नाही. यामुळे आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून शासनाने महिला वर्गाला खुश करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेस महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे आता शेतकरी वर्गाला खुश करण्यासाठी शासनाने मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना आता वीज बिल शून्य मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सर्वच पक्ष व नेते मंडळींनी सुरू



केली आहे. उमेदवारी मिळावी म्हणून इच्छुक उमेदवारांच्या मुंबई वाऱ्या सुरू झाल्या आहेत. सोलापूर जिल्ह्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीप्रमाणे ते विधानसभा निवडणुकीत करिष्मा करतील. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटांकडून उमेदवारी मिळावी म्हणून सोलापूर जिल्ह्यातील अनेक नेते मंडळींनी शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारी मागणी केली आहे. मात्र पवार कोणाला उमेदवारी देणार याकडे लक्ष लागले आहे. शासनाने शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारने पीएम किसान योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांला वर्षाला सहा हजार रुपये मिळणार आहेत. तर राज्य शासनाने याच धरतीवर नमो शेतकरी योजना सुरू केली आहे. या अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये देण्यात येणार आहेत. एकंदरीत वर्षाला शेतकऱ्यांना 12 हजार रुपये केंद्र व राज्य शासनाकडून मिळणार असल्याने शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## » At a Glance

### सोलापूर विमानसेवेचा पंतप्रधानांच्या हस्ते आज प्रारंभ



**सोलापूर :** सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घाईगडबडीत उरकला जात आहे.

### मी अपक्ष असतानाही अजितदादांनी माझ्यावर विश्वास ठेवला



**माढा :** मी अपक्ष असतानाही अजितदादांनी माझ्यावर विश्वास ठेवला. त्यांनी कधीही मला परकेपण जाणवू दिले नाही. तालुक्याच्या विकासासाठी मी जे काही मागितले, ते दादांनी दिले असल्याचे करमाळा तालुक्याचे आमदार संजय शिंदे यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेचे करमाळा येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संजय शिंदे बोलत होते.

### सोलापूर जिल्ह्याची खरी ओळख अजितदादांमुळेच तयार झाली

**सोलापूर :** आजच्या घडीला सोलापूर जिल्ह्याची ओळख सर्वाधिक साखर कारखान्यांचा जिल्हा म्हणून झाली आहे. त्याचे खरे श्रेय राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना जाते. जलसंपदा खात्याचे मंत्री असताना त्यांनी जिल्ह्याच्या दुष्काळी भागाला पाणी देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला, असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले. करमाळा येथे आयोजित जनसन्मान यात्रेत ते बोलत होते.

# पंधरा दिवस चाललेले अमरण उपोषण अखेर स्थगित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी पंढरपुरात धनगर समाजातील नेत्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. मात्र आहे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी पंढरपुरात टिळक स्मारक मैदान येथे धनगर समाजातील नेते दीपक बोराडे, गणेश केसकर, योगेश धरम, यशवंत गायके, विशाल टुमनर, माऊली हळणवर हे आमरण उपोषणास बसले होते. १५ दिवस उपोषण सुरू होते.मात्र शासनाकडून जीआर न आल्याने अखेर समाजातील वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करण्यात



आली. यानंतर उपोषण स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. समाजातील ज्येष्ठ समाजसेवक विशाल कोकरे यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना लिंबू सरबत देऊन उपोषण स्थगित करण्यात आले. यानंतर संध्याकाळी उपोषणकर्ते रुग्णवाहिकेतून संभाजीनगर कडे रवाना झाले. येथील जात पडताळणी कार्यालयात होणाऱ्या धनगड प्रमाणपत्र रद्द करावे. या सुनावणीस उपस्थित राहून धनगर समाजातील नेते कार्यकर्ते आंदोलन करणार आहेत. धनगर समाजाला आरक्षण मिळावे म्हणून पंढरपुरात धनगर समाजातील नेत्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.

उपोषणास पंधरा दिवस झाले तरी शासनाकडून म्हणावी तशी दखल घेतली जात नसल्याने राज्यातील सर्व गावातील धनगर समाजातील नेते पंढरपुरात दाखल झाले होते. यावेळी बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुढील दिशा ठरविण्यात आली. यावेळी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार उपोषणकर्त्यांनी आंदोलन लिंबू सरबत घेऊन मागे घेतले.



### गुरुवारी पुकारलेला सोलापूर बंद मागे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांना सकल मराठा समाज शहर व जिल्हा सोलापूर यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे की, संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण स्थगित झाल्यामुळे व मनोजदादा यांनी आज केलेल्या आवाहनानुसार उद्या जो त्यांच्या समर्थनार्थ सोलापूर शहर व जिल्हा बंद पुकारला होता तो रद्द करण्यात येत आहे. तरी या बंदच्या निमित्ताने जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, सर्व समाजघटक, तसेच व्यावसायिक, विद्यार्थी यांची जी गैरसोय होणार होती. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत आहोत, असे पत्रक सकल मराठा समाजाने काढले आहे.

### पंढरीत एक हजार कामगारांना गृहोपयोगी वस्तू संचाचे वाटप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून सक्रिय जीवित नोंद असणा-या कामगारांना गृहोपयोगी साहित्य संचाचे वाटप सत्यशोधक कामगार संघटनेच्या माध्यमातून पंढरपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे करण्यात आले. यावेळेस संचाचे वाटप प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले, या वेळी परिचारकांनी संबोधित करताना कामगारांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कामगारांचा घरकुल प्रश्न प्राधान्याने सोडवून, पंढरपूर नगर परिषदेच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजनेची घरे कामगारांना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार. कामगारांना शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य, सामाजिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार. सामाजिक कार्य करताना उपेक्षित, वंचितांसाठी काम करणे महत्वाचे असल्याचे सांगितले. यावेळेस रवी सर्वगोड, प्रदीप परकाळे, शाहू सर्वगोड, किशोर कदम, समाधान भोसले, सतीश सर्वगोड, सिध्दनाथ सांवत, राजेंद्र सर्वगोड, लक्ष्मण बंगाळे, तुकाराम मोळावडे, शरद सोनवणे, अमोल पाटील, गणेश सर्वगोड, स्वप्नील कांबळे, सुरज साखरे इत्यादी उपस्थित होते.

### आमदार शहाजी पाटील यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजी पाटील यांनी निवडून आल्यापासून आपण मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडवून विविध विकास योजना राबविण्यावर सातत्याने भर दिल्याचे सांगितले. सांगोला नगर परिषद हद्दीत विविध ठिकाणी सामाजिक सभागृह, अभ्यासिका, समाजमंदिर बांधकामासह इतर विविध विकासकामांसाठी २० कोटी रुपये निधी मंजूर करून आणला आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी रेकॉर्डब्रेक निधी खेचून आणण्यात यश मिळाले असून, मतदारसंघासाठी भरघोस विकासनिधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सरकारचे मन: पूर्वक आभार मानले आहेत.

### ब्राह्मण महासंघ पंढरपूर शाखेच्या वतीने समाज सेवक व्यक्तींची विचार-विनिमय बैठक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ब्राह्मण महासंघ पंढरपूर शाखेच्या वतीने पंढरपूर, सांगोला,माळशिरस,मंगळवेढा या 4 तालुक्यातील समाज सेवक व्यक्तींची विचार-विनिमय बैठक जिल्हा संघटक अमृता बडवे यांच्या निवासस्थानी पार पडली. यावेळी अनेक क्षेत्रात कार्य करणाऱ्या ब्राह्मण समाजाचे तरुण तरुणी उपस्थित होते. महाविद्यालयीन तरुणांचे संघटन, व्यवसाय, उद्योग पर्यटन, अर्थकारण यावर चर्चा करण्यात आली त्यादृष्टीने जिल्ह्यातील तरुणांचे प्राथमिक एक दिवसीय कार्यशाळा उमेद घेण्याचे ठरले. यावेळी तालुका अध्यक्ष चैतन्य केसकर, उपाध्यक्ष पिंटू कुलकर्णी चळे, शहराध्यक्ष भक्ती उत्पात शहर उपाध्यक्ष देवकी बडवे, व्याख्याते तुकाराम चिंचणीकर, वकील संदीप कागदे, पत्रकार कल्याण कुलकर्णी, सुप्रिया मुदगल अकलूज, अमृता कुलकर्णी बीटरगावकर, श्रद्धा देशपांडे सांगोला, अनिता बेले सांगोला, भोसेकर कुलकर्णी, संजय दिवेकर, वैभव बडवे, महेश कोर्टीकर, सौ.वांगीकरसह 25 जण उपस्थित होते. याबाबत प्रास्ताविक भक्ती उत्पात यांनी केले. जिल्हा संघटक अमोल कुलकर्णी यांनी तब्बल 2 तास युवक संघटन व सर्व कार्यपध्दती सांगून मार्गदर्शन केले. यावेळी अनेक प्रश्न शंका समाधान वेळी जिल्हाभर नियोजन करण्याचे ठरले.

### जिल्हाधिकाऱ्यांचे मतदारांना आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्याची अंतिम मतदार यादी दि. 30 ऑगस्ट 2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून 37 लाख 63 हजार 789 इतकी एकूण मतदार संख्या आहे. या अंतिम मतदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करावी. बहुतांश वेळा मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीमध्ये नाही अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते, अशी तक्रार येऊ नये यासाठी नागरिकांनी आपली नावे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबतची खात्री करावी. तसेच नाव नसल्यास नोंदणी करावी, असे आवाहन तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

### आंदोलन....

पंढरी संचार छायाचित्र सेवा





**पंढरपूर :** करकंब ग्रामपंचायतचा मनमानी कारभार सुरू असल्याने याची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी करकम येथील ग्रामस्थांनी पंढरपूर येथील पंचायत समितीवर मोर्चा काढून हलगी नाद आंदोलन केले.

## जिल्ह्यातील शिलेदारांकडून खरे यांची शिफारस ; अजित दादांना नामोहरम करण्याची नवी युक्ती !!

# खरे यांची उमेदवारी ही पवारांचीच खेळी ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विश्वासू, निकटच्या गोटातील शिवसेनेचे नेते अशी खास ओळख असलेले येथील उद्योजक राजू खरे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख खा.शरद पवार यांची भेट घेतली. मोहोळ राखीव विधानसभा मतदारसंघातून खरे हे 'तुतारी' घेऊन लढणार असल्याच्या चर्चांना या भेटीने बळ मिळाले असून प्रस्थापित नेतेमंडळींसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

पंढरपूरची १७, उ. सोलापूरची २४ गावे आणि मोहोळ तालुका मिळून हा मतदारसंघ बनलेला आहे. गेल्या तीन निवडणुकीत या ठिकाणी ऐनवेळी बाहेरचा उमेदवार देऊन राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळविला आहे. मात्र, बाहेरच्या, गेटकेन उमेदवारांमुळे मतदारसंघ विकासापासून वंचित राहिल्याचा मुद्दा उपस्थित करीत



खा.शरद पवार यांची भेट घेऊन सत्कार करताना राजू खरे

राजू खरे यांनी गेल्या दोन-तीन वर्षांपासून जोरदार रान उठवले आहे. कोणत्याही परिस्थितीत या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा निर्धार करून जोरदार तयारी चालविली आहे. या अंतर्गत अनेक वर्षांच्या शिवसेनेतील संबंधांचा फायदा घेत थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आ.भरतशेठ गोगावले, खा. संदीपान भुमरे यांच्या माध्यमातून विविध योजनांमधून मतदारसंघात कोट्यावधींचा निधी खेचून आणला. याच बरोबर स्वखर्चाने » पान ३ वर

**• नेतेमंडळींचा 'ग्रीन सिग्नल' ?**

मोहोळ मतदारसंघात राजू खरे यांनी मोठे काम करून वेगळी ओळख निर्माण केली आहे. याची दखल राष्ट्रवादीने घेतल्याचे बोलले जात होते. त्यातूनच प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांच्यासह वरिष्ठ नेतेमंडळींनी खरे यांच्या नावाला 'ग्रीन सिग्नल' दिल्याचे समोर येत आहे. अखेर या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून खरे यांची पक्षाध्यक्ष खा.शरद पवार यांच्याशी भेट घडली. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला 'चितपट' करण्यासाठी स्वत: खा.शरद पवार यांनीच हा डाव टाकल्याची चर्चा होत आहे.

पंढरी संचार

### मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ आज बार्शी बंद!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** मराठा आरक्षणसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ गुरुवार 26 सप्टेंबर रोजी बार्शी शहर व तालुक्यात बंद पुकारण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मराठा समाज बांधवांच्यावतीने नायाब तहसीलदार व बार्शी शहर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 9 वा दिवस आहे. मात्र, शासनाने अद्यापही त्यांच्या मागण्यांसंदर्भात भूमिका स्पष्ट केली नाही. त्यामुळे, राज्यातील विविध जिल्ह्यात बंद पुकारण्यात येत आहे.

### उजनीतून भीमा नदीत ३० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग

**पंढरपूर :** परतीच्या पावसाने भीमा निरा खोऱ्यात दमदार हजेरी लावली आहे. यामुळे उजनी धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक होत आहे. उजनी धरण १०८ टक्के भरले असल्याने पूर नियंत्रण करण्यासाठी उजनी धरणातून भीमा नदीत ३० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत आहे. यामुळे भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे. म्हणून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बुधवारी सायकाळी सात वाजता ३० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गेल्या तीन दिवसापासून राज्यात परतीच्या पावसाने जोर धरला आहे. भीमा निरा खोऱ्यात दमदार पाऊस होत असल्यामुळे दौंड येथून उजनी धरणात ३० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग येत आहे. उजनी धरण १०८ टक्क्याहून अधिक भरले असल्याने उजनी धरणातून काल मंगळवारी सायंकाळी पाच वाजता भीमा नदीत ५ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत होता. आता बुधवारी दुपारी बारा वाजता यात वाढ करण्यात आली असून १० हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग भीमा नदीत सोडण्यात येत आहे. बुधवारी सायंकाळी साडेसात वाजता तो वाढवून ३० हजार क्सुसेक्स करण्यात आला आहे. यामुळे भीमा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतकरतेचा इशारा देण्यात आला आहे. लवकरच नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार असल्याने प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**सांगोला :** सालगड्यानं नातेवाइकाच्या लग्नाला जाऊन दोन दिवसात परत येतो असे कारण सांगून दुचाकी घेऊन गावी गेला. त्यानंतर वारंवार फोन केल्यानंतरही सालगड्याने वेगवेगळी कारणे सांगून कामावर परत येण्यास टाळाटाळ करून वृद्ध शेतकरी महिलेकडून १ लाख २ हजार रुपयांची उचल घेऊन दुचाकी परत न देता फसवणूक केली. ही घटना १ मे २०२४ रोजी पाच महिन्यांपूर्वी बागलवाडी (ता. सांगोला) येथे घडली. लक्ष्मी बागल (रा. बागलवाडी, ता. सांगोला) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मेहबूब शेख (रा. दर्शनहळ्ळी ) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## सांगोला तालुक्यातील उड्डाणपूलाखालील रस्त्याला नदीचे स्वरुप

# एखतपुर उड्डाणपूलाखालील पाण्याचा निचरा तात्काळ करावा : अशोक कामटे संघटना





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला- एखतपुर मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग खालील पावसाचा पाण्याचा निचरा करावा अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग NHAI विभागाकडे शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केली आहे.

या एकतपुर मार्गावर NH- 166 उड्डाणपूल जातो त्याखाली सर्विस रोड असल्याने दोन्ही बाजूने तीवर उतार असल्याने पावसाचे पाणी ब्रिज खाली कायमस्वरूपी साठून राहते या उड्डाण पुलाखाली हा पुल बांधल्यापासून , नेहमी पाऊस झाला की तीन ते चार फूट पाणी साचते. या मार्गावरून अनेक शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला सायकल, दुचाकी, चार चाकीवरून प्रचंड वर्दळ असते, परिणामी गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे या साठणाऱ्या तळ्यात अनेक छोटे-मोठे अपघात दररोज घडत आहे. या राष्ट्रीय महामार्ग लगत जाणाऱ्या सर्विस रोड लगत कोणत्याही प्रकारची महामार्ग रस्ता तयार करतेवेळी या विभागाने ड्रेनेज बांधलेली नसल्याने ही समस्या उद्भवत आहे .सतत पाणी साठून तीस फुटाच्या रस्त्यामध्ये मोठ -मोठे खड्डे पडल्याने खड्डे चुकवताना अपघात घडत आहेत. तरी या प्रश्णी तात्काळ राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर यांनी लक्ष देऊन ही समस्या दूर करावी अशी अनेक नागरिकांनी अशोक कामटे संघटनेकडे सूचना केलेली आहे. या सूचनेप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक यांना निवेदन पाठवले आहे. या समस्यांच्या निवेदनाची दखल घेऊन आवश्यक त्या उपयोजना करून हा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करणार असल्याचे शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेच्यावतीने माहिती देण्यात आली.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तरुण ठार




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** अज्ञात चारचाकी वाहनाची दुचाकीला जोराची धडक बसून अपघातात ३४ वर्षीय तरुण जागीच ठार झाला. हा अपघात रविवारी रात्री ९ च्या सुमारास सांगोला ते कडलास रोडवरील गायकवाड वस्तीजवळ घडला. सचिन पांडुरंग आमले (वय ३४, रा. जवळा, ता. सांगोला) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंभू राज साळुंखे यांनी खबर दिली आहे. तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल धनंजय औताडे करीत आहेत. सचिन आमचे यांच्या अपघात प्रकरणी गावातील ग्रामस्थांमधून उलट सुलट चर्चा सुरु असल्याचे दिसून येत आहे.

## Selected

### चेन्नई-मुंबई एक्स्प्रेसच्या घातपाताचा कट उधळला



**कुर्डूवाडी :** सोलापूर-कुर्डूवाडी रेल्वे मार्गावर फॉलिंग मार्क असे लिहिलेला सिमेंटचा खांब ठेवल्याची घटना रात्री अकराच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान, लोको पायलट, लोहमार्ग पोलिसांच्या सतर्कतेमुळे चेन्नई-मुंबई एक्स्प्रेसचा घातपाताचा कट उधळला गेला. 19 दिवसांच्या काळात अशापद्धतीने रेल्वेरुळावर अडथळा निर्माण करण्याची ही दुसरी घटना समोर आली आहे.

### शहर उत्तरची जागा काँग्रेसकडे घ्या



**सोलापूर :** काँग्रेस सेवा दल यंग ब्रिगेडचे अध्यक्ष सुदीप चाकोते यांनी मुंबई येथे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत शहर उत्तर मतदार संघात काँग्रेस निश्चित विजयाचा ध्वज फडकवल्याशिवाय राहणार नाही. शहर उत्तर मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता व आहे म्हणून पुन्हा हा मतदार संघ आपल्याकडे घेण्यात यावा, अशी मागणी करून त्या संदर्भातला अहवाल सादर केला.

### टिप्परने धडक दिल्याने तरुण ठार



**माढा :** टेंभुर्णी औद्योगिक वसाहतीतून काम करून दुचाकीवरून घरी निघालेल्या दोन तरुणांना मुरूम वाहतूक करणाऱ्या टिप्परने जोरदार धडक दिल्याने माणिक अंकुश साळुंखे (वय २०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. हा अपघात २३ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता कुडूवाडी-टेंभुर्णी रोडवर घडला. अज्ञात टिप्परचालकाविरुद्ध टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कुरनूर धरण लवकरच शंभरी गाठणार



**माढा :** अक्कलकोट तालुक्याचे वरदायिनी असलेले कुरनूर धरण उजनीतून सोडलेल्या पाण्यामुळे आणि मुसळधार पावसामुळे 80 टक्के पेक्षा जास्त भरले आहे. यामुळे भविष्यातील पाणीटंचाईचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे. तुळजापूर व नळदुर्ग भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे तसेच एकरूप योजनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या पाणी प्रवाहामुळे कुरनूर धरणातील जलसाठा वाढला आहे. याशिवाय बोरी व हरणा या दोन्ही नद्या चांगल्याच प्रवाहित झाल्या आहेत. यामुळे धरण लवकरच शंभरी गाठणार असल्याचे सध्याचे चित्र आहे.

## पेहे गावात पायाभूत सुविधा गरजेच्या - मिनल साठे



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा मीनल साठे यांच्या सुरू असलेल्या गावभेट दौर्यानिमीत्त मीनल साठे यांनी पेहे गावास भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी आणि अपेक्षांविषयी माहिती घेतली. गावाच्या विकासासाठी योग्य उपाययोजनांवर चर्चा करताना, त्यांना ग्रामस्थांच्या समस्यांबाबतची गंभीरता जाणवली. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि इतर आवश्यक बाबींवर तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत साठे यांनी यावेळी मांडले.

## भेट....


पंढरी संचार छायाचित्र सेवा



**बार्शी :** माजी मंत्री दिलीप सोपल हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा सक्रिय होणार, असे दिसू लागले आहे. बार्शीची जागा महायुतीत पूर्वी शिवसेनेकडे होती. आता महाविकास आघाडीतही ती उद्धवसेनेकडेच राहील, असे दिसत आहे. सोपल यांनी गेल्यावेळी शिवसेनेकडूनच निवडणूक लढवली होती. आता महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा सुरू आहे. अशातच आज माजी मंत्री दिलीप सोपल यांनी खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांच्यासोबत 'मातोश्री'वर जाऊन रश्मी ठाकरे यांची भेट घेतली.

## सोलापुरात पोक्सो अंतर्गत एकावर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** जेलरोड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामण्णा उर्फ बालाजी सुभाष मुदगल राहणार सोलापूर असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. तू दिसायला सुंदर आहेस, मला तुझा मोबाईल नंबर दे असे म्हणून अल्पवयीन मुलीस लज्जा निर्माण होईल असे कृत्य केल्यावर प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना 21 सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता अल्पवयीन मुलगी शाळेला जात असताना घडली. हा प्रकार मुलीने आपल्या चुलत्याला सांगितल्यानंतर याप्रकरणी चुलत्याने पोलिसात फिर्याद दिली आहे.

## पत्नीवर कोयत्याने हल्ला; पतीसह दिरास अटक




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** एका महिलेवर कोयत्याने वार करून जखमी केल्याची घटना मारुती माळी यांच्या पत्र्याच्या घराच्या उंबऱ्यावर रांझणी (ता. पंढरपूर) येथे घडली. याप्रकरणी संबंधित महिलेच्या पती सागर पवार व दिर श्रीकांत पवार यांना पोलिसांनी अटक केली आहे. सूत्रांकडून माहितीनुसार, सिद्धेश्वर शिंदे यांची भाची उर्मिला पवार (रा. रांझणी) हिचा मुलगा प्रज्वल बाजारात गेला. उर्मिला यांचे पतीने तू माझे भावाला का मारले, असे म्हणत कोयत्याने मानेवर, दोन्ही हातांवर, गालावर, डोक्यावर वार करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## अभिजीत नलवडे यांची विधानसभा संपर्कप्रमुखपदी निवड



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** शिवसेना पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते अभिजीत नलवडे यांची सांगोला विधानसभा संपर्कप्रमुखपदी निवड झाली. याबद्दल त्यांचा सांगोल्याचे आमदार शहाजी पाटील यांच्या हस्ते सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समर्थ नेतृत्वाखाली शिवसेनेची ध्येय-धोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटन मजबूत करण्याच्या कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. लवकरच विधानसभेच्या निवडणूका लागणार आहेत. यासाठी सर्वच पक्षांनी आपापले उमेदवार देण्यास सुरुवात केली आहे. विधानसभेसाठी सर्वच पक्षांनी आपआपल्या सदस्यांची निवड करण्यास सुरुवात केली आहे.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

गोपाळ क्लॉथ सेंटर

पंढरपूरच्या कापड व्यवसायातील मेरुमणी



प्रोप्रा. लक्ष्मीनारायण भट्टड

पत्ता- महाद्वार चौक, पंढरपूर (फोन नं.०२१८६-२२३१३३)

## पुण्यातील संचेती,अकलूजच्या अश्विनी हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने

# अकलूज येथे अस्थी रोग व मणक्याचे विकार शिबीर संपन्न

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** अकलूज येथे पुण्यातील संचेती,अकलूजच्या अश्विनी हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने अश्विनी हॉस्पिटल येथे अस्थी रोग व मणके विकार शिबीर संपन्न झाले.या मोफत निदान व उपचार शिबिरात ७२९ रुग्णांनी लाभ घेतला.

अकलूज येथे झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ.पराग संचेती म्हणाले की,स्वतःची प्रकृती चांगली असेल तरच आपण परिवाराची काळजी घेऊ शकतो,रोजच्या जीवनातही तज्ञ डॉक्टरांकडून वेळीच तपासण्या करून घेऊन,योग्य आहार घेत वजन नियंत्रीत ठेवल्यास गुडघे व मणक्यांचे दुखण्यापासून मुक्तता मिळु शकते.मात्र दुर्लक्ष करण्याने हे आजार बळावतात. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बोलताना डॉ.एम. के.इनामदार म्हणाले की, कोणत्याही आजाराचे अचुक निदान झाले व वेळेवर उपचार केले तर पुढे त्रासदायक ठरत नाही.उपचार घेण्याची सर्वांची परिस्थिती नसते,अशा शिबीरातून उपचाराची संधी मिळते,त्याचा लाभ घेतला पाहिजे.संचेती हॉस्पिटलने ग्रामीण भागात हे शिबीर आयोजित करुन रुग्णसेवेचा वसा जोपासला असल्याचे ते म्हणाले. यावेळी बोलताना मणके विकार तज्ञ डॉ. अभिनव भुसे म्हणाले घराघरात गुडघेदुखी व मणक्यांच्या आजाराचे रुग्ण आढळत आहेत. तरुण पिढीतही अस्थिरोग वाढत चालला आहे.व्यायामाचा अभाव,व्यवस्थित झोप न घेणे,आहारातील फास्टफुडचे प्रमाण यासाठी कारणीभुत आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःचा आरोग्य विमा उतरवणे महत्वाचे असल्याचेही ते म्हणाले. यावेळी माळशिरसचे तहसील सुरेश शेजुळ,मणके विकार तज्ञ डॉ.अभिनव भुसे,इंडियन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संजय सिद,सचिव डॉ.निखिल मिसाळ, डॉ.रावसाहेब गुळवे आदी उपस्थित होते. सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत चाललेल्या या शिबिरात संचेती हॉस्पिटलचे तज्ञ डॉ.पराग संचेती, डॉ.अभिनव भुसे,डॉ.प्रदिप बोद्रे, डॉ.अमीत वाकेकर,डॉ.जय चाकोरे,डॉ.अभिषेक वाळवी यांनी ७२९ रुग्णांच्या अस्थिरोग व मणक्याच्या आजारावरील तपासण्या करुन प्रथमोपचार व पुढील मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सुधीर पोफळे यांनी केले तर आभार डॉ.आनंद बस्ते यांनी मानले.



पंढरी संचार



# विश्ववेध

## गुगलच सांगणार भविष्यातील दिशा!

आपल्या हातात स्मार्टफोन आल्यापासून अख्खं जग जवळ आलेय, हे खरे असले तरी स्मार्टफोन वापरणाऱ्या व्यक्तींची सर्व माहिती गुगलकडे जाऊ लागली आहे. स्मार्टफोन वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी काय आहेत, सवयी काय आहेत, त्या व्यक्ती कुठे जातात, कुठे किती वेळ व्यतीत करतात, कोणाला भेटतात, कोणाशी काय पत्रव्यवहार करतात ही सर्व माहिती गुगलकडे रोजच्या रोज जमा होत असते. गुगल आता आपल्या सर्वांच्या आयुष्यात इतका मिसळून गेला आहे, की त्याच्याशिवाय आयुष्याची कदाचित कल्पनाही करवणार नाही. अर्थातच, ही बाब खूप धोकादायक आहे. वेगवेगळ्या सर्व्हिसेसमधून, वेगवेगळ्या पद्धतींनी आणि युझर्स कसा वापर करतात त्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून गुगल डेटा जमा करत आहे. गुगलकडे आजच्या घडीला जेवढा डेटा आहे, तेवढा कोणाकडेही नसेल. कदाचित आपण स्वतःलाही ओळखत नसू, एवढा गुगल आपल्याला ओळखत असेल.

आपण गुगलवर काय सर्च करतो, सर्चवर किती वेळ व्यतीत करतो, रोज कुठे जातो-येतो, कोणत्या सेवा घेतो, ऑनलाईन काय करतो, ऑनलाईन काय वाचतो, या सगळ्याची माहिती गुगलकडे साठवली जाते. असे म्हटले जाते, की युझर्सचे बोलणेही स्मार्टफोनवर अनेक ॲप्सच्या माध्यमातून रेकॉर्ड केले जात असते. ई-मेलमध्ये काय लिहिले जात आहे, यावरही गुगलची नजर असते. या सर्व माहितीच्या एकत्रीकरणातून गुगलला युझर्सचे वर्तन कळते. त्यातून युझरचे एक मोठे प्रोफाईल तयार केले जाते. त्यात तो काय करतो, त्याचं व्यक्तिमत्त्व कसे आहे, आवडी-निवडी काय आहेत, वर्तन कसे आहे, त्याची गुपिते काय आहे, याचा त्यात समावेश असतो. त्यातून तो त्या व्यक्तीचे सतत विश्लेषण करत राहतो.

गुगल मॅपसारख्या सेवा वापरणाऱ्या व्यक्ती कुठे प्रवास करतात, त्याची नोंद गुगलकडे होते. युझर किती वाजता घराबाहेर पडतो, कोणत्या मार्गाने कुठे जातो, कुठे थांबतो, ही माहिती युझरच्या नकळत रेकॉर्ड केली जाते. त्यामुळे सर्व रूटिन गुगलला कळते. तिकीट बुकिंगबद्दलही गुगलला कळते. साहजिकच, आता हवामानाच्या अंदाजाप्रमाणे येत्या काही दिवसांत गुगल असेही सांगू शकेल, की पुढच्या काही दिवसांत तुम्ही काय करणार आहात?

असे सांगितले जाते की, गुगलचा अल्गोरिदम अत्यंत हुशार आहे. तो युझर्सच्या डेटाचे विश्लेषण करून त्यातून असा काही निष्कर्ष काढतो, की कदाचित खुद्द युझरलाही स्वतःबद्दल इतकी माहिती नसेल. युझरच्या पर्सनॅलिटीची परिपूर्ण माहिती गुगल तयार करतो. युझर रोज कुठे राहतो, त्याच्या घरात कोण आहे, ही सगळी माहिती गुगलला फोटोज आणि संवादातूनही कळते. गुगलचा डेटा आता इतका समृद्ध झाला आहे, की प्रत्येक भागातल्या व्यक्तींचा स्वभाव, त्यांचे कल आणि समज आदी बाबींचे सहज वर्गीकरण तो करू शकतो. त्यामुळे आपण पुढील काही दिवसांत काय करणार आहोत, हे गुगलने सांगण्यात कठीण तसे काहीच नाही, ही देखील कटू वस्तुस्थिती!




## सर्वात झोपाळू देश!

सध्याच्या काळात नागरिक आपल्या आरोग्याबद्दल खूप सजग झाले आहेत. काही जण जेवण्याच्या, झोपण्याच्या वेळा कटाक्षाने पाळतात. निरोगी राहण्यासाठी व्यायाम आणि आहार जितका महत्त्वाचा आहे, तितकीच झोपदेखील गरजेची आहे. झोप पूर्ण झाल्याने फ्रेश वाटते, अनेक आजार टाळण्यास मदत होते. रोज पूर्ण झोप घेतल्याने हृदयाचे आजार होण्याचा धोका कमी होतो.




ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४मध्ये कोणत्या देशातले नागरिक सरासरी किती तास झोपतात, याबद्दल माहिती दिली आहे. या यादीत सर्वाधिक झोप घेणाऱ्या देशांच्या यादीत नेदरलँड अव्वलस्थानी विराजमान आहे. ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४ नुसार, नेदरलँड्सचे नागरिक झोपेच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर आहेत.

या अभ्यासात दिलेल्या माहितीनुसार, नेदरलँड्समधील नागरिक रोज सरासरी ८.१ तास झोपतात. नेदरलँडनंतर या यादीत फिनलंडचा क्रमांक लागतो. फिनलंडचे नागरिक दररोज आठ तास झोपतात. अन्य देशांमध्ये झोपेचे प्रमाण न्यूझीलंड - ७.८ तास, यूके - ७.८ तास, कॅनडा ७.७ तास, डेन्मार्क ७.७ तास, अमेरिका ७.६ तास, जर्मनी ७.६ तास, स्वीडन ७.६ तास, इटली ७.५ तास, बेल्जियम ७.५ तास, स्पेन ७.४ तास, जपान ७.४, दक्षिण कोरिया ७.४ तास, ब्राझील ७.३ तास, रशिया ७.३ तास, मेक्सिको सरासरी ७.२ तास, इतके आहे. ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४मधील माहितीनुसार, या यादीत ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे. तेथील नागरिक ७.९ तासांपर्यंत झोपतात. यानंतर चौथा क्रमांक फ्रान्सचा आहे. तिथले नागरिकही ७.९ तासांपर्यंत झोपतात. झोपण्याच्या बाबतीत भारत या यादीत २०व्या क्रमांकावर आहे. या अभ्यासानुसार, भारतातील नागरिक सरासरी ७.१ तास झोप घेतात.

## कथा सर्वात छोट्या विमानतळाची

आजकाल विमानाने प्रवास करणे साधारण होत चालले आहे. तसा आताही विमान प्रवास खर्चिकच आहे. पण, बऱ्याचदा वेळ महत्त्वाचा असतो आणि काही वेळा हौसेला मोल नसते. त्यामुळेही विमान प्रवासाला प्राधान्य दिले जाते. भारतासह जगभरातील देशांमध्ये विमानतळे आहेत. काही आंतरराष्ट्रीय विमानतळ इतके आलिशान आहेत की, प्रवासी तासन्तास तिथे थांबू शकतात. तर काही ठिकाणी विमानापर्यंत पोहोचण्यासाठी बस केल्या जातात; पण काही विमानतळे अगदीच छोटीशी असतात. एक विमानतळ तर इतके छोटे आहे की, तेथे वातानुकूलित शॉप्स सोडा, अगदी साधा आडोसा देखील नाही. या सर्वात छोट्या विमानतळावरून प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी प्रवाशांना येथे नजीकच असलेल्या आंब्याच्या झाडाखाली बसून विमानाची प्रतीक्षा करावी लागते.

भारतासह सर्व देशांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. प्रवासी आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून उड्डाण करून जगभर प्रवास करतात. आजही विमानतळाचे नाव ऐकल्यावर सर्वसामान्य माणसाला काहीतरी मोठी गोष्ट करतोय, असं वाटतं. पण, या विमानतळावर असं काही नाही. कोलंबियातील अगुआचिका नावाच्या ठिकाणी हाकारितामा विमानतळ आहे, जे आपल्या लहान जागेमुळे जगभरात प्रसिद्ध आहे. या विमानतळावर दोनच वेटिंग एरिया आहेत. एवढेच नाही तर सामान तपासण्यासाठी येथे स्कॅनर नसून, ते मॅन्युअली तपासले जाते. प्रत्यक्षात येथे स्कॅनर मशिनला जागा नाही. शिवाय विमानतळावर येताना प्रवाशांना उन्हात रांगेत थांबावे लागते.



## एलियन्सबाबत बोलणेही खतरनाक

एलियन्स किंवा यूएफओ हा सुरुवातीपासूनच मानवासाठी उत्सुकतेचा विषय राहिला आहे. अंतराळात जीवन अस्तित्वात आहे की नाही, हे लोकांना नेहमी जाणून घ्यायचे असते. लोक आकाशात यूएफओ पाहिल्याचा दावा करतात आणि काही तज्ज्ञही त्याला दुजोरा देतात. एलियन्सबद्दल शास्त्रज्ञही अनेक दावे करत आहेत; पण एलियन्सबाबत बोलणेही खतरनाक ठरू शकतं, याबाबत शास्त्रज्ञांनी सावधानतेचा इशारा दिला आहे.

किंग्ज कॉलेज लंडनमधील संशोधक टोनी मिलिगन यांनी द कॉन्व्हर्सेशनमध्ये याचा उल्लेख केला आहे. नवीन संशोधनानुसार एलियन्सबद्दल अधिक चर्चा केल्याने व्यापक सामाजिक समस्या निर्माण होत आहे. हा विश्वास थोडासा विरोधाभासी आहे. कारण, एलियन अस्तित्वात असल्याचा कोणताही पुरावा आपल्याकडे नाही, असे ते म्हणाले.



**नेमकं काय म्हणाले शास्त्रज्ञ ?**

ते म्हणाले की, एलियन्स आपल्याला भेटायला येतील, असा विचार करणे मूर्खपणाचे वाटते. याशिवाय, तारा प्रणालींमधील अफाट अंतर लक्षात घेता, फक्त एका प्रवासात आपण त्यांच्याबाबत जाणून घेऊ, हे विचित्र वाटते. एलियन्सचे पुरावे दूरच्या ग्रहांवरून आलेल्या सिग्नल्सवरून मिळण्याची शक्यता जास्त आहे. मिलिगन म्हणतात की, खतरनाक आकडेवारी दर्शवते की जवळजवळ एक चतुर्थांश अमेरिकन लोकांचा असा विश्वास आहे की, त्यांनी यूएफओ पाहिला आहे. उल्लेखनीय म्हणजे, लुईस यांनी असेही सांगितले की, अमेरिकन सरकारला त्यांच्या अस्तित्वाबद्दल अनेक वर्षांपासून माहिती आहे आणि ते लपवत आहेत. यूएपी-कमिशन केलेल्या २०१९ गॅलप सर्वेक्षणानुसार, ६८ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की, अमेरिकन सरकारला यूएफओबद्दल अधिक माहिती आहे. ते म्हणाले की एलियन्सवर सतत चर्चा केल्याने बाहेरील जीवनाचा शोध घेण्याचे खरे प्रयत्न देखील कमी होऊ शकतात. आपल्या ग्रहाच्या पलीकडे जीवसृष्टी आहे की नाही, याची पुष्टी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी आता अवकाशातील खडकाच्या काही तुकड्यांचा अभ्यास केला आहे.

गेल्या शतकात बाह्य अवकाशातील ढिगाऱ्यांचे तुकडे पृथ्वीवर पडले आणि त्यात न्यूक्लिओबेस आहेत, जे आकाशगंगेच्या पलीकडे जीवन दर्शवू शकतात. शास्त्रज्ञांनी उल्कापिंडात पाच विशेष डीएनए शोधले आहेत, जे एलियनच्या अस्तित्वाकडे निर्देश करू शकतात. शास्त्रज्ञ आता खडकांमध्ये सापडलेल्या पाच प्रमुख घटकांचं विश्लेषण करत आहेत, ज्यात ॲडेनाईन, ग्वानिन, सायटोसिन, थायमिन आणि युरासिलचे कोड समाविष्ट आहेत.

## कसला हा अद्भूत प्रकाश?



अंतराळात बरीच रहस्ये आहेत, ज्यांचा शोध शास्त्रज्ञ घेत आहेत. अंतराळाचे असे अद्भुत फोटोही सोशल मीडियावर पोस्ट होत असतात. अमेरिकन स्पेस एजन्सी नासा असे कितीतरी फोटो शेअर करत असते. नासाने शेअर केलेला असाच एक फोटो पाहून सर्वच जण थक्क झाले आहेत.

गडद आकाशातील ताऱ्यांमध्ये लाल-केशरी कोळ्यासारखा आकार, मध्यभागी गुलाबी आणि आजूबाजूला नारिंगी. हा अद्भुत असा प्रकाश पाहून सगळ्यांचे डोळे दिपले. हा प्रकाश नेमका कसला, असा प्रश्न अनेकांना पडला. नासाने फोटो शेअर करताना याबाबत माहितीही दिली आहे.

नासाने दिलेल्या माहितीनुसार आहे. हा रेड स्पायडर नेब्युला आहे. रेड स्पायडर नेब्युला पृथ्वीपासून ३००० प्रकाशवर्ष दूर आहे. नेब्युला म्हणजे वायू आणि धुळीचा एक मोठा ढग, जो ताऱ्यांमध्ये अंतराळात तरंगतो. रेड स्पायडर ब्युलामधील तारा सर्वात उष्ण ताऱ्यांमध्ये गणला जातो. ते त्याच्या सभोवतालचे वायू गरम करते, १०० अब्ज किलोमीटर उंच शॉकवेव्ह तयार करते.

या लाटा या प्रतिमेत दिसणाऱ्या स्पायडर लेगसारखा आकार तयार करतात. काही दिवसांपूर्वी शेअर केलेल्या या पोस्टला जवळपास सहा लाख लाईक्स मिळाले आहेत आणि अनेक युजर्सनी कमेंट सेक्शनमध्ये आश्चर्य व्यक्त केले

## अतिमौल्यवान हिऱ्यातले गणराया

सुरत येथील हीरा उद्योगपती कनु आसोदरिया यांच्याजवळ नैसर्गिकरीत्या मिळालेल्या हिऱ्यांचा गणेश आहे. गणेशाच्या आकाराचा हा हिरा कोहिनूर हिऱ्यापेक्षाही मोठा आहे. इतकेच नव्हे, तर बाजारात याची किंमत ६०० कोटी रुपयांपेक्षाही जास्त सांगितली जात आहे. गणपतीवर असलेल्या श्रद्धेपोटी कनु आसोदरिया यांनी अनेक मौल्यवान दगड एकत्र केले आहेत. खाणीत खोदकाम करत असताना त्यांना असे अनेक दगड सापडले होते. ते त्यांनी सुरक्षित ठेवले. त्यांनी नैसर्गिकरीत्या मिळालेल्या दगडात गणपतीची मूर्ती असल्याने त्यास सांभाळून ठेवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १५ वर्षांपूर्वी व्यावसायिक कनु आसोदरिया जेव्हा व्यवसायाच्या निमित्ताने बेल्जियम याठिकाणी गेले होते तेव्हा ते रफ डायमंड (कच्चा हिरा) घेऊन परतले होते. याचदरम्यान, त्यांच्या वडिलांना एक स्वप्न आले की, 'या रफ डायमंडमध्ये गणेशजी आहेत.' जेव्हा त्यांनी या रफ डायमंडला अत्यंत नीट पाहिले तेव्हा त्यांना त्यात गणेशाची मूर्ती दिसली आणि तेव्हापासून ते या हिऱ्याची पूजा करत आहेत. या रफ डायमंडचे वजन १८२.३ कॅरेट आणि ३६.५ ग्रॅम आहे. विशेष बाब म्हणजे, सुरत येथील हे गणेशजी इतने मौल्यवान आहेत की, त्यांची पूजा आणि दर्शन संपूर्ण वर्षभरात फक्त एकच दिवस केले जाऊ शकते.



कनुभाई यांनी गणेश चतुर्थीला आपल्या घरी जगातील सर्वात महागडा हिरा असलेल्या गणेशाची स्थापना केली. या हिऱ्याची नोंद लंडन येथे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सने जगातील सर्वात अद्वितीय म्हणून केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हाही कनुभाई यांना या हिऱ्याच्या किमतीबाबत विचारले जाते तेव्हा, 'मी कधीच याबाबत विचार केला नाही. कारण माझ्यासाठी तो अनमोल आहे, हे एकच उत्तर ते देतात. हा रफ डायमंड म्हणजे कच्चा हिरा १८२ डायमंडचा आहे, जो कोहिनूर हिऱ्यापेक्षाही मोठा आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, 'हा एक नैसर्गिक हिरा आहे आणि ते आफ्रिकेत उत्खनन करताना तो मिळाला आहे. आम्ही त्याला इथे आणल्यावर एके सकाळी माझ्या वडिलांनी मला सांगितले की, आपण हिऱ्याच्यारूपाने गणेशाजवळ पोहोचलो आहोत. यानंतर जेव्हा आम्ही तपासणी केला तेव्हा आम्हाला या हिऱ्याच्या रूपाने गणेशाचा आशीर्वाद मिळाल्याचे जाणवले. गणेशोत्सवादरम्यान, त्याची पूजा केली जाते आणि गणेशजी कर्माचे देव असल्याने आम्ही या मूर्तीला 'कर्म गणेशा' नाव दिले आहे. तसेच हा हिरा सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

## चीनही जाणार आता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर

चीनने आता आपल्या नव्या चांद्रमोहिमेची माहिती दिली आहे. ही मोहीम दोन टप्प्यांत होईल. त्यामध्ये चंद्राचा - पृष्ठभाग आणि कक्षेत नोड्सची एक श्रृंखला बनवली जाईल. चीन आणि रशिया या मिशनवर एकत्रितपणे काम करीत आहेत. दोन्ही देशांमधील तज्ज्ञांच्या संयुक्त पथकाच्या नेतृत्वाखाली इंटरनॅशनल लुनार रिसर्च स्टेशन (आरएलआरएस) बाबतचा रोडमॅप जून २०२१ मध्ये लाँच करण्यात आला होता. त्यावेळी या मोहिमेत २०३० ते २०३५ पर्यंत पाच सुपर हेवी-लिफ्ट रॉकेट लाँचच्या माध्यमातून एक पायाभूत, रोबोटिक मून बेस बनवण्याची योजना होती. चीन आता या प्रोजेक्टचे नेतृत्व करीत आहे. चीनने नुकतेच अनहुई प्रांतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय 'डीप स्पेस एक्सप्लोरेशन' संमेलनात 'आरएलआरएस'च्या दोन चरणांमधील योजनांची माहिती दिली. चीनी अंतराळ संशोधन परियोजनेचे मुख्य डिझायनर वू यानहुआ यांच्या माहितीनुसार, पहिला टप्पा चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ २०३५ च्या आसपास पूर्ण होईल आणि एक विस्तारित मॉडेल सुमारे २०५० पर्यंत बनवले जाईल. चीनचे हे मॉडेल एक व्यापक मून स्टेशन नेटवर्क असेल जे मून ऑर्बिट स्टेशनला आपल्या केंद्र व दक्षिण ध्रुव स्टेशनला प्राथमिक आधाराच्या रुपात उपयोगात आणेल. त्यामध्ये चंद्र भूमध्य रेखा आणि चंद्राच्या दूरवरच्या भागातील संशोधन नोड्स समाविष्ट होतील. 'आयएलआरएस'ला सौर, रेडिओआयसोटोप आणि आण्विक जनरेटरने संचालित केले जाईल. पायाभूत रचनेत चंद्र पृथ्वी आणि उच्च गतीचे चंद्राच्या पृष्ठभागावरील नेटवर्क, हॉपरसारखे चांद्रवाहन, एक मानवरहीत दीर्घपल्ल्याचे वाहन, दबावयुक्त व विनादबावाचे चालक दल असलेले रोव्हर असतील.



## गूढ विवराच्या विस्ताराचे

रशियातला सैबेरिया हा प्रदेश पूर्वीपासून काहीसा गूढ आहे. तिथे हाडे गोठवून टाकेल, असे थंड वातावरण आहे, तसेच घनदाट जंगले देखील आहेत. अशा या गूढ ठिकाणी असलेल्या याना नदीच्या खोऱ्याजवळ जमिनीत एक मोठे विवर (क्रेटर) आहे. ते जंगलांनी वेढलेले आहे. या विवराला बाटागायका क्रेटर असे म्हणतात. काही स्थानिक नागरिक याला गेटवे टू हेल असेही म्हणतात. सध्या हे विवर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. याचे कारण म्हणजे, या विवराच्या वाढत्या आकाराने शास्त्रज्ञांना गोंधळात टाकले आहे. आता हा खड्डा २०० एकर क्षेत्रावर पसरला असून, ३०० फूट खोल झाला आहे. बर्फ वितळल्यानंतर आणि पाणी वाहून गेल्यानंतर असे घडते, असे सांगण्यात येते.

शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, केवळ ३० वर्षांत हे विवर तिप्पट वाढले आहे. ते इतके मोठे झाले आहे, की आता अंतराळातूनही दिसत आहे. या वाढीमुळे आजूबाजूच्या परिसरातली जमीनही कमी होत आहे. याशिवाय भूस्खलनाचा धोकाही वाढत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हा क्लायमेट चेंजचा परिणाम असू शकतो. काही दशकांपूर्वी हा भाग बर्फाने झाकलेला होता. बर्फ वितळल्यानंतर ते दृष्टीस पडल्यावर, त्याचे फोटो पाहिल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. कारण, या विवराची खोली इतकी जास्त होती, की लोक इथे जायला घाबरू लागले. म्हणूनच त्याला



गेटवे टू हेल असे नाव देण्यात आले. बाटागायका विवर हे या भागातल्या सर्वांत मोठ्या विवरांपैकी एक आहे. त्याचा आकार स्टिंग रे, हॉर्सशू क्रॅब किंवा मोठ्या टॅडपोलसारखा आहे. हे क्षेत्र नेहमी गोठलेले असते आणि त्याला पर्माफ्रॉस्ट असे म्हणतात. प्रत्यक्षात बाटागायका विवर हे पर्माफ्रॉस्टचा एक भाग आहे. तो सध्या वेगाने वितळत आहे. नासा या अमेरिकी संस्थेच्या मते, पर्माफ्रॉस्ट म्हणजे जमीनच असते. ही जमीन कमीत कमी सलग दोन वर्षे शून्य अंश सेल्सिअस तापमानात पूर्णपणे गोठलेली असते. उत्तर आणि दक्षिण ध्रुवाजवळच्या भागात असे अनेक पर्माफ्रॉस्ट आहेत. त्यांनी पृथ्वीचा मोठा भाग व्यापलेला आहे. विशेषतः उत्तर गोलार्धात पृथ्वीच्या पृष्ठभागाचा एक चतुर्थांश भाग पर्माफ्रॉस्टखाली आहे. पर्माफ्रॉस्टमध्ये ८० टक्के बर्फ असतो. याशिवाय, तिथे माती किंवा वाळू किंवा काही वनस्पती असतात. बाटागायका विवर सुमारे ६,५०,००० वर्षे जुने आहे. शास्त्रज्ञांच्या मते, १९६०च्या दशकात हे विवर उघडे पडण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यापूर्वी रशियन लोकांनी सैबेरियन जंगलाची एक पट्टी साफ केली होती. त्यामुळे उन्हाळ्याच्या उष्णतेत पर्माफ्रॉस्ट वितळण्यास सुरुवात झाली. तो आता अर्धा मैल रुंद आणि ३०० फूट खोल झाला आहे. त्याचा आकार दिवसेंदिवस वाढत आहे.

